# जाहिरात

## महाराष्ट्र शासन

## वनविभाग

### मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती, कॅम्प - ४४४ ६०२

**जाहिरात क्रमांक कक्ष-८/आस्था/ससेवरभरती/ १६३६ / दिनांक २७ सप्टेंबर २०१६**

**(अर्ज फक्त ONLINE पध्दतीनेच स्विकारण्यात येतील)**

अमरावती वनवृत्ताच्या आस्थापनेवरील **वनरक्षक या संवर्गातील सरळसेवेने** नियुक्तीसाठी **उमेदवारांकडून दिनांक** १९/१०/२०१६ पर्यन्त Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सुचना व भरावयाचे अर्ज maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व आनुषंगीक सुचना काळजीपूर्वक वाचावी.

**१. वनरक्षक संवर्गातील रिक्त पदसंख्या, वेतनश्रेणी,शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा,शारीरिक पात्रता,ईत्यादिचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

१.१ सरळसेवा वनरक्षक पदसंख्या - ६९

| सामाजीक आरक्षण | अ.जा. | अ.ज. | *स्थानिक अनुसूचित जमाती | विशेष व्याघ्र संरक्षण दलातंर्गत *स्थानिक अनुसुचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| एकुण | ०३ | ०६ | १० | ११ (माजी सैनिक प्रवर्गातील अनुशेष) | ०० | ०१ | ०२ | ०१ | ०० | १२ | २३ | ६९ |

*** स्थानिक अनुसूचित जमाती -** शासन अधिसूचना क्र आरबी /टीसी/ई-13013(4)/नोटिफिकेशन-1/474/2014, दिनांक 9 जून 2014 तसेच शासन अधिसूचना क्रमांक RB/TC/e-1313(4)/Notification 2/474/2014/730 दिनांक 14 ऑगष्ट 2014 अनुसार स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवार म्हणजे जे अनुसुचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई वडील/ किंवा आजी-आजोबा संधीत जिल्ह्याच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये (अमरावती जिल्हयातील धारणी व चिखलदरा तालुका) दिनांक 26 जानेवारी 1950 पासुन सातत्याने वास्तव्य करीत आहेत असा.

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

१.२ परिच्छेद १.१ मधील तक्त्यातील रकाना ४ आणि ५ वगळून उर्वरीत ४८ पदांतील प्रवर्गनिहाय समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| प्रवर्ग | महिला | प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त | भूकंप-ग्रस्त | माजि सैनिक | अतिउच्च गुणवत्ता-धारक खेळाडू | होम-गार्ड | अंश-कालीन / पदविधर | रोजदारी वनमजूर | सर्व-साधारण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 30% | 5% | 2% | 15% | 5% | 5% | 10% | 10% | | |
| अनुसूचित जाती | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 02 | 03 |
| अनुसूचित जमाती | 02 | 00 | 00 | 01 | 00 | 00 | 01 | 01 | 01 | 06 |
| विमुक्त जाती-अ | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| भटक्या जमाती -ब | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 01 |
| भटक्या जमाती-क | 01 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 02 |
| भटक्या जमाती-ड | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 01 |
| विशेष मागास प्रवर्ग | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| इतर मागास वर्ग | 04 | 01 | 00 | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 12 |
| सर्वसाधारण (खुला) | 07 | 01 | 00 | 03 | 01 | 01 | 02 | 02 | 06 | 23 |
| एकूण:- | 15 | 02 | 00 | 06 | 02 | 02 | 04 | 04 | 13 | 48 |

१.३ परिच्छेद 1.1 मधील तक्त्यातील रकाना क्रमांक 4 व 5 मधील स्थानिक अनुसूचित जमातीची 21 पदे (अमरावती जिल्हयातील फक्त धारणी व चिखलदरा या तालुक्यापुरता)

| प्रवर्ग | महिला | प्रकल्प ग्रस्त / धरणग्रस्त | भूकंप -ग्रस्त | माजि सैनिक | अतिउच्च गुणवत्ता-धारक खेळाडू | होम-गार्ड | अंश-कालीन / पदविधर | रोजदारी वनमजूर | सर्व-साधारण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 33% | 5% | 2% | 15% | 5% | 5% | 10% | 10% | | |
| परिच्छेद 1.1 मधील तक्त्यातील रकाना क्रमांक 4 मधील 10 पदांचा तपशिल | 03 | 01 | 00 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 10 |
| विशेष व्याघ्र संरक्षण दल मेळघाट व्याघ्र प्रकल्प अंतर्गत स्थानिक अनुसुचित जमाती या प्रवर्गातील अनुशेष (धारणी व चिखलदरा तालुका) परिच्छेद 1.1 मधील तक्त्यातील रकाना क्रमांक 5 मधील 11 पदांचा तपशिल | 00 | 00 | 00 | 11 (अनुशेष) | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 11 |
| एकूण:- | 03 | 01 | 00 | 12 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 21 |

1.3.1 उक्त तक्त्यातील दर्शविलेल्या 21 पदे हे फक्त धारणी व चिखलदरा तालुक्यातील स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवाराकरीता राखीव आहेत.

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

1.3.2 माजी सैनिक या प्रवर्गात माजी सैनिकांसोबतच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीए-1082/3502/सीआर-100/16-अ/ दिनांक 2 सप्टेंबर 1983 अनुसार युध्द काळात किंवा युध्द नसतांना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त एक व्यक्ती सुध्दा अर्ज करु शकेल.

१.३.३ या जाहिरातीत उक्त नमूद केलेली पदसंख्या व आरक्षणाचे प्रमाण दिनांक ३१-१२-२०१६ पर्यन्त रिक्त होणा-या पदसंख्येवर आधारीत आहे. उक्त पदसंख्येत व आरक्षणाच्या प्रमाणात ही जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर या संदर्भात शासनाकडून निर्गमीत होणा-या निर्देशाच्या अधीन राहून किंवा प्रशासकीय कारणास्तव बदल होऊ शकतो.

२. **वेतनश्रेणी :-** (वेतन श्रेणी रु.५२०० - रु.२०२००, ग्रेड वेतन - रु.१८००)

**३. शैक्षणिक पात्रता**

३.१ उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी ) विज्ञान किंवा गणित किंवा भूगोल किवा अर्थशास्त्र या विषयासह १२ वी उत्तीर्ण.

३.२ शासनाने वेळोवेळी घोषीत केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना आणि अनुसूचित जमातीतील सर्व उमेदवारांसाठी शैक्षणिक अर्हता माध्यमीक शालांत परिक्षा ( ईयत्ता १० वी) उत्तीर्ण अशी राहील.

३.३ शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६-अ, दिनांक ५ ऑक्टोबर १९८९ नुसार एसएससी उत्तीर्ण आणि कमीत कमी सेवा १५ वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्याजवळ सैन्यसेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे असे माजी सैनिक वनरक्षक पदासाठी पात्र ठरतील. याबाबत शासन पत्र क्रमांक एफएसटी ११/१३/प्र.क्रं. ६१८/फ-४/ दिनांक ६ मार्च २०१४ नुसार माजी सैनिकांसाठी वनरक्षक पदासाठी ईयत्ता १० चेच गुण विचारात घेतले जातील.

४. **वयोमर्यादा :- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते २५ वर्ष. उमेदवार दिनांक २६ सप्टेंबर ११९१ पूर्वी आणि २६ सप्टेंबर १९९८ नंतर जन्मलेला नसावा.**

४.१ **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे........**

४.१.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.
४.१.२ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०-१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ/ दिनांक २० ऑगष्ट २०१० नुसारे माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष इतका राहील.

४.१.३ शासन निर्णय क्रमांक राक्रीयो २००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२/ दिनांक ३० एप्रिल २००५ अन्वये पात्र खेळाडुच्या बाबत ५ वर्षापर्यंत

४.१.४ सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१००६/मुस ३९६/प्र.क्रं.५६/०६/१६-अ/ दिनांक ३ फेब्रुवारी २००७ धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

४.१.५ शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक बैठक २०१०/प्र.क्र.७/फ-९/ दिनांक १६ ऑक्टोबर २०१२ अनुसार वनविभागातील रोजंदारी मजूरांना वयाची अट शिथीलक्षम राहील.

४.१.६ शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक/पअक-१००५/प्रक्र.३६/०५/१६-अ/ दिनांक २६ ऑगष्ट २००५ अनुसार सुशीक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत ३ वर्ष अंशकालीन काम केलेल्या पदवीधर /पदविकाधारक उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

## ५. शारीरिक पात्रता.

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | -- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापदंडानुसारनुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापदंडानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

| (अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम) | | |
|---|---|---|
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | -- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापदंडानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापदंडानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

वरिल नमुद ऊंची, वजन व छातीचे मोजमापाकरीता **शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.२४/८/२०११ मधील** शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-१९८१ मधील परिशिष्ट-३ मध्ये मध्ये विहीत केलली ऊंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही ऊंचिच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील.

५.१ दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

**<u>दूरदृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

## जवळील दृष्टी

| अधिक चांगला डोळा (सुधारलेली दृष्टी) | वाईट डोळा |
|---|---|
| J.१ | J.११ |

**प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.**

५.२ शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

५.३ नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनरक्षक व वन कर्मचा-यांच्या मुलांना शारीरिक पात्रतेबाबत खालील नमुद केलेल्या प्रमाणे सुट राहील.

१) उंची :- पुरूष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी. सुट
२) छाती :- मोजणी आवश्यक नाही.

५.४ सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालीलप्रमाणे सवलत राहील.

१) उंची :- पुरूष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी. सुट
२) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता १.० से.मी. फुगवून

५.५ **खेळाडू प्रवर्ग :-** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणा-या खेळाडूंना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

५.६ शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक एफटीआर १५०४/प्र.क्र.१३६/फ-४/ दि २७ सप्टेंबर २००७ अनुसार वनरक्षक पदांना अपंग आरक्षणापासून संपूर्ण सुट देण्यात आलेली आहे.

### ६. निवडीची पध्दत :-

६.१ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा व विशेष सुट (लागू असल्यास) करीता विहीत मापदंड इत्यादीची पूर्तता करतात किंवा कसे, याची शहानिशा करण्यात येईल.

६.२ जे उमेदवार शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादेची अट, उक्त पदाकरीता पात्रता पूर्ण करीत असतील अश्याच उमेदवारांची शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. पुरुष व महिला उमेदवारांकरीता सर्व प्रथम अनुक्रमे ५ कि.मी. व ३ कि.मी. ची धावण्याची चाचणी व पुढील टप्प्यात अनुक्रमे २५ कि.मी. व १६ कि.मी. चालण्याची चाचणीचा समावेश राहील. धावण्याची चाचणी कमाल ३० मिनिटात व चालण्याची चाचणी कमाल ४ तासात पूर्ण करणे आवश्यक राहील. या प्रयोजनार्थ उमेदवारांनी खालील प्रपत्रात शासकिय वैद्यकीय अधिकारी कडून शारीरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उक्त प्रमाणपत्र सादर न करणा-या उमेदवारांचा भरतीमधील पुढील प्रक्रीयेकरीता विचार केला जाणार नाही.

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati

## वनरक्षक भरती २०१६
## शारीरिकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र

उमेदवारांचे छायाचित्र

ओळखपत्र क्रमांक .........

प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री/श्रीमती -- - - - - - - - - - - -- - - - -- - - - -- - -- - - - राहणार मु पो. - - - - - - - - - - - - - -ता.- - - - - - - - - - - जिल्हा - - - - - -- - - -- - - हे अमरावती वनवृत्तासाठी वनरक्षक भरती २०१६ मधील **धावण्याचे चाचणीकरीता** आवश्यक असलेले *पुरुष ५ कि.मी. /महिला ३ कि.मी. ३० मिनिटात पूर्ण **करणे** व **शारीरीक क्षमता चाचणी** करीता आवश्यक *पुरुष २५ कि.मी./ महिला १६ कि.मी. ४ तासामध्ये *पूर्ण **करणेस** शारीरिकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक :
ठिकाण

शासकिय वैद्यकिय अधिका-याचे नांव
**पदनाम व शिक्का**

*** लागू नसलेला मजकूर खोडावा**

६.३ धावण्याची चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ किमी व महिला उमेदवारांनी ३ किमी जास्तीत जास्त ३० मिनीटामध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील. उक्त धावण्याची चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल. धावण्याचे चाचणीमध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या ३ पट ऐवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहीत करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल. उक्त चाचणीत -

१. पहिल्या येणा-या ३ उमेदवारास (क्रमांक १ ते ३ वरील आलेले) यांना प्रत्येकी -१० गुण
२. त्यानंतर येणा-या ५ उमेदवारास (क्रमांक ४ ते ८ वरील आलेले) यांना प्रत्येकी -८ गुण
३. त्यानंतर येणा-या ७ उमेदवारास (क्रमांक ९ ते १५ वरील आलेले) यांना प्रत्येकी -६ गुण
४. त्यानंतर येणा-या १० उमेदवारास (क्रमांक १६ ते २५ वरील आलेले) यांना प्रत्येकी -४ गुण
५. त्यानंतर येणा-या १५ उमेदवारास (क्रमांक २६ ते ४० वरील आलेले) यांना प्रत्येकी -२.५ गुण

यांप्रमाणे गुणांचे मारांकन करण्यात येईल.

६.४ शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५ % भारांकन व उर्वरित १२.५ % भारांकनाकरीता उक्त परिच्छेद क्रं. ६.३ मधील धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण याची बेरीज करुन उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

**उदाहरणार्थ :-** श्री "क" या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता परिक्षा (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा मध्ये एकूण निर्धारित ५०० गुणापैकी ३०० गुण प्राप्त केले आहे. त्यांची टक्केवारी ६०% येईल, त्यांचे ८७.५ % भारांकन म्हणजे ५२.५० ऐवढे येईल. तसेच ५ कि.मी / ३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरित १२.५% भारांकन करीता ८ गुण मिळतील. याप्रमाणे गुणवत्ता यादी करीता त्यास वरील परिच्छेद क्रं ६.३ मधील सुत्रानुसार त्यांना मिळणारे गुण = ५२.५० + ८ = ६०.५० अशा प्रकारे गणना केली जाईल.

६.५ उक्त चाचणीमधून पुढील पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांचे ते विहीत शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा व विशेष सुट करिता दावे इ. चे बाबीची पूर्तता करतात किंवा कसे याची शहानिशा करण्यात येईल.

६.६ सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरीक पात्रता धारण करतात किंवा कसे, हे निश्चीत करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

६.७ शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट व शारीरीक पात्रता धारण करणारे आणि उपरोक्त प्रथम धावण्याची चाळणी मधून पुढील टप्प्यासाठी पात्र उमेदवारांची शारीरीक क्षमता चाचणी खालीलप्रमाणे घेण्यात येईल...

शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.३० जुलै, २०११ अन्वये **पुरुष उमेदवारांना २५ कि.मी. चालणे व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालणे ४ तासात पूर्ण करणे अनिवार्य राहील.** जे उमेदवार सदरची शारीरिक क्षमता ४ तासात पूर्ण करणार नाहीत, असे उमेदवार निवडीस पात्र ठरणार नाहीत. तसेच उक्त चाचणीसाठी वेळापत्रकानुसार विहीत केलेल्या दिनांकास अनुपस्थित राहणारे उमेदवार निवडीस पात्र ठरणार नाहीत.

६.८ शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट, शारीरिक पात्रता धारण करणारे आणि वरील परिच्छेद ६.७ मधील उल्लेखीत शारीरिक क्षमता चाचणी नंतर पांत्र ठरलेले उमेदवारांची अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल.

६.९ अंतीम निवडसूचीतील उमेदवार नियुक्ती/पदस्थापनेचे आदेशानुसार वनरक्षक पदावर रुजू न झाल्यास किंवा सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र पडताळणी किंवा अन्य कोणतेही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास, अश्या उमेदवाराचे नियुक्ती आदेश रदद करुन निवडसूचीतील प्रतिक्षा यादीवरील जेष्ठतेनुसार पुढील उमेदवारास नियुक्तीबाबत संधी देण्यात येईल.

## ७. सेवाशुल्क :-

उमेदवारांनी **ONLINE** पध्दतीने अर्जानुसार सेवाशुल्क खालीलप्रमाणे भरणा करावे.

| प्रवर्ग | आवेदन शुल्क |
|---|---|
| खुला | रु. ३००/-<br>(अक्षरी रु तिनशे) |
| मागावर्गीयां करीता/<br>राखीव प्रवर्ग | रु. १५०/-<br>(अक्षरी रु दिडशे) |
| माजी सैनिक | नाही |

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

ONLINE पध्दतीने प्राप्त केलेली चालान **भारतीय स्टेट बँकेच्या** च्या कोणत्याही शाखेमध्ये जाऊन भरणा करावी व चालानची प्रत अर्जदाराने जपून ठेवावी. वनविभागाने मागणी केल्यास ती सादर करणे आवश्यक राहील.

**ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना**

| अ.क्रं | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यन्त |
| १ | **अर्ज ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी.** | २९/०९/२०१६ | १९/१०/२०१६ |

**८. अर्ज करण्याची पध्दत :-**

८.१ अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला ऑन लाईन अर्ज maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटव्दारे दिनांक २९/९/२०१६ ते १९/१०/२०१६ या कालावधीतच सादर करणे आवश्यक आहे.

८.३ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वतःचा फोटो (३ से.मी. x ४.५ ) स्वतःची स्वाक्षरी (रुंदी ३ से.मी. X उंची २.५ से मी ) आणि ३०० DPI Resolution आणि ५० के.बी पेक्षा कमी साईज होईल अशा पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. ( फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेश पत्रावर/अर्जावर दुस-याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.

८.४ ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सविस्तर सुचना maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

८.५ विहीत पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर विहीत मुदतीत परिक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.६ अर्ज ऑन लाईन अथवा महा ई सेवा केन्द्राव्दारेच भरता येईल. महा ऑन लाईन लिमीटेड या संस्थेकडून प्रतैयक जिल्हयात महा ई सेवा केन्द्र उभारण्यात आले आहे या महा ई सेवा केन्द्राची यादी www.mahaonline.gov.in किंवा maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

८.७ उमेदवारांनी यापुर्वी maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाइटवर आपले खाते तयार केलेले असल्यास नव्याने खाते तयार करण्याची गरज नाही.

८.८ त्यानंतर उमेदवारास प्रोफाईल निर्मीती मध्ये जाऊन स्वतःची संपुर्ण माहिती भरावी लागेल. maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटवर यापुर्वी प्रोफाईल निर्मीतीमध्ये जाऊन स्वतःची प्रोफाईलमधील माहिती कधीही अद्यावत करु शकतो.

८.९ उमेदवाराने युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगीन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंकवर क्लीक करावे. त्या कार्यालया अंतर्गत उपलब्ध जाहीराती अर्ज करण्यासाठी येथे क्लीक करा या संदेशासह दाखविल्या जातील.

८.१० क्लीक केल्यानंतर उमेदवार जाहीरातीत नमुद शैक्षणीक पात्रता/इतर बाबीची पुर्तता करत असेल तर अर्ज स्विकारला जाईल अन्यथा अर्ज अनधीकृत ठरेल.

Chief Conservator of Forests(Territorial) Amravati.

**९.० आवेदनशुल्क खालील दिलेल्या पर्यायानुसार अदा करता येईल.**

**९.१ आवेदन शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खाली नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा :-**

**भारतीय स्टेट बॅंकमध्ये चलानव्दारे २) नेट बॅंकींग ३) डेबीट कार्ड**

**९.१.१** युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉगीन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील **माझे खाते** या लिंकवर क्लीक करावे.

९.१.२ **माझे खाते** या लिंकवर क्लीक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/ न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. पदासमोर Unpaid असे लिहीलेले असेल त्या ठिकाणी Pay Now अश लिंक उपलब्ध असेल.

९.१.३ Pay now या लिंकवर क्लीक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील १) ऑन लाईन पेमेंट २) चलानव्दारे

९.१.४ उमेदवारांने चलानव्दारे हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलानाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बॅंक कोणत्याही शाखेत, बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

९.१.५ चलानव्दारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बॅंक उमेदवारांकडून शुल्का व्यतिरिक्त रु ५०/- सेवा शुल्क म्हणून आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चालानव्दारे शुल्क भरतांना शुल्क अधिक रुपये ५०/- (बॅंकेचे सेवा शुल्क) भरावे लागेल.

९.१.६ ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बॅंकमध्ये चलानव्दारे शुल्क भरावयाचे ओ असे उमेदवारार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरती आवश्यक आहे.

९.२ उमेदवारांची धावचाचणीची दिनांक निश्चित झाल्यानंतर ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे Online पध्दतीने maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर प्रवेशपत्र भरतीच्या प्रत्येक टप्प्यात उमेदवाराने सादर करणे आवश्यक आहे.

९.३ विहीत पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही तसेच भारतीय स्टेट बॅंकेमध्ये चलानव्दारे परिक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास ऑन लाईन चलानची प्रत प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही **दिनांक** १८-१०-२०१६ पर्यन्त पुर्ण करणे आवश्यक आहे, त्यानंतर सदर वेब लिंक बंद होईल.

९.४ चलानव्दारे शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बॅंकेमध्ये १९/१०/२०१६ पर्यन्त बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहीत दिनांकानंतर शुल्क भरल्यास वैध मानल्या जाणार नाही. तसेच शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

९.५ उमेदवारास अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास ०२२-६११९१६४०० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

१०. निवड प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख | १९ ऑक्टोंबर २०१६ |
| २ | शारिरीक पात्रता धारण करीत असलेले उमेदवारांसाठी ५ कि.मी. (पुरुष) व ३ कि.मी. (महिला) धावण्याची चाचणी. | ५,६,७ नोव्हेंबर २०१६ |
| ३ | धावण्याची चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता व शारीरिक मोजमाप तपासणी | १७ नोव्हेंबर २०१६ |
| ४ | शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादेची अट व शारिरीक पात्रता धारण करणारे आणि उपरोक्त प्रथम धावण्याचे चाचणीमध्ये पुढील टप्प्यासाठी पात्र उमेदवारांची २५ कि मी (पुरुष) व १६ कि मी (महिला) चालण्याची चाचणी | २३ नोव्हेंबर २०१६ |

टिप :-

**उक्त वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याबाबत** maharecruitment.mahaonline.gov.in **या संकेतस्थावर कळविण्यात येईल. उमेदवारांनी उक्त संकेतस्थळावर सतत पाहात राहावे.**

**११. आरक्षणाबाबत सूचना :-**

११.१ "महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७/८/२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तग्रस्तांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून आरक्षणाअंतर्गत भुकंपग्रस्तासाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागू राहील"

११.२ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८१/१३-अ दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाचा प्रत्येक प्रवर्गामध्ये उभे आरक्षण जसे अ.जा, अ.ज, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व आरक्षणानुसार होणा-या राखीव पदाची संख्या पदाच्या तपशिल या शिर्षातर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येईल.

११.३ शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६/प्र.क्र.१५/ मावक-५ दिनांक ५/६/२००६ अन्वये विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग यांना क्रीमीलेअरचे तत्व लागू करण्यात आलेले आहेत, व त्याप्रमाणे उमेदवाराने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.४ महिलांसाठी लागू असलेले ३० टक्के आरक्षण असलेले पदांकरीता आवेदन सादर करणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का-२/ दिनांक २५ मे २००१ अनुसार क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

११.५ शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक/पअक-१००९/प्रक्र.२००/२००९/१६-अ/ दिनांक २७ ऑक्टोबर २००९ अनुसार "सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करून सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल."

११.६ आरक्षित पदांच्या संदर्भात शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र/बीसीसी/२०११/प्रक्र-१०६४/२०११/१६ब/दिनांक १२-१२-२०११ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आंत सक्षम प्रधीका-याकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन नियुक्ती प्राधीकरणाकडे सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा दिलेली नियुक्ती रदद ठरेल.

११.७ अत्युच्य गुणवत्ताधारक खेळाडू या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम प्राधिका-याने जारी केलेले प्रमाणपत्र सादर करावे लागतील.

**१२. सर्वसाधारण अटी :-**

१२.१ सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

१२.२ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर विहित केलेल्या पध्दती प्रमाणे अर्ज करावा.

१२.३ वनविभागात कार्यरत रोजंदारी मजूरानी वनरक्षक पदाकरीता विहीत पात्रतेनुसार विहित केलेल्या पध्दती प्रमाणे **ऑनलाईन अर्ज सादर करावा.**

१२.४ पडताळणी अंती अर्ज रद्य ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार प्रादेशिक निवड समितीकडे राहतील.

१२.५ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

१२.६ उमेदवारांना शारिरीक क्षमताचाचणी परिक्षा व ईतर बाबीकरीता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

**१३. इतर आवश्यक सूचना :-**

१३.१ उमेदवाराने जाहिरात काळजीपर्वूक वाचावी.

१३.२ उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास, अपात्र ठरेल.

१३.३ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

Chief Conservator of Forests (Territorial) Amravati.

१३.४ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी रदद ठरेल.

१३.५ निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती अमरावती किंवा बुलडाणा जिल्हयातील कोठेही होऊ शकते.

१३.६ भरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही व त्याबाबतची कोणत्याही स्वरुपाची नुकसान भरपाई देय राहणार नाही.

१३.७ ONLINE पध्दतीने उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी नमुद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्यास, तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रदद ठरेल व त्यानंतर याबाबत उमेदवारांची कोणत्याही प्रकारची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१३.८ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी नोंद करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

१३.९ पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने अथवा या कार्यालयाचे संकेतस्थळावर पाठवू नये.

१३.१० उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाइन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे.ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रूटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्वीकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

१३.११ वनरक्षक पदासाठी धावण्याची चाळणी चाचणी ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने चाचणीचे आधारे उमेदवारांना निवडबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. जे उमेदवार उक्त पदाकरीता आवश्यक अर्हता व शारीरिक पात्रता पूर्ण करीत अशयांचीच सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतीम निवड केली जाईल.

१३.१२ भरतीसंबंधी वेळोवेळी maharecruitment.mahaonline.gov.in संकेतस्थळावर सुचना जाहीर करण्यात येईल. उमेदवारांनी नियमितपणे संकेतस्थळावर पाहणी करावी.

१३.१३ शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत उमेदवारांनी त्यांचे अर्ज संबंधीत विभागातील सक्षम प्राधीकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीने भरावे.

१३.१४. अर्ज एकदा ऑनलाइन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशील स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

अध्यक्ष
प्रादेशिक निवड समिती
तथा
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक) अमरावती